दिव्य लोकप्रभा
Sun 04-02-2024
Page No. 1





# नाट्यसंमेलनाने फेडले बीडकरांच्या डोळ्याचे पारणे

## डॉ.दीपाताईंचे मार्गदर्शन : योगेशभैय्या,सारिकाताईंचे सुरेख नियोजन





बीड (प्रतिनिधी) शहरात झालेले अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे विभागीय नाट्य संमेलन ऐतिहासिक आणि बीडकरांच्या डोळ्याचे पारणे फेडणारे ठरले. या नाट्य संमेलनांतर्गत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांना बीडकरांनी तुफान गर्दी केली. नाट्य परिषदेच्या बीड शाखाध्यक्ष डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्वागताध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर, डॉ. सारिका क्षीरसागर यांच्या नियोजनातून हा देखणा सोहळा उत्साहात झाला. बीड येथे आयोजित १०० व्या विभागीय नाट्य संमेलनात शेवटच्या टप्यात नाट्यघंटा व नटराज मूर्तीचे हस्तांतरण लातूरला करण्यात आले. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले यांच्या हस्ते व बीड शाखेच्या अध्यक्षा डॉ.दीपा क्षीरसागर, स्वागताध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर, नाट्य दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी, गणेश चंदनशिवे, सचित पाटील, गौरी कुलकर्णी यांच्या हस्ते लातूर शाखेला पुढील कार्यक्रमाचा मान देण्यात आला. १ व २ फेब्रुवारी रोजी बीड येथे अखिल भारतीय नाट्य परिषदेच्या वतीने १०० वे विभागीय नाट्य संमेलन पार पडले. यापूर्वी बीडमध्ये ८९ वे नाट्य संमेलन झालेले होते. नाट्य संमेलनासाठी दिवसभर नागरिकांची मोठी गर्दी दिसून आली. शहरातील नाट्य दिंडीपासून ते अगदी संगीत रजनीच्या कार्यक्रमापर्यंत प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ठिकठिकाणी उभारण्यात आलेल्या स्वागत कमानी, शुभेच्छा फलक, कार्यक्रमस्थळी करण्यात आलेली सजावट लक्ष वेधून घेत होती. यासह कार्यक्रमाची वातावरणनिर्मिती हे सर्व क्षण बीडकरांनी डोळ्यांत साचलवे. दरम्यान, कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी बीड येथील नाट्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते लातूर येथील शैलेश गोजमगुंडे यांना नाट्यघंटा व नटराज मूर्तीचे हस्तांतरण करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने रसिक हजर होते.

**सांस्कृतिक कार्यक्रमांना बीडकरांनी केली तुफान गर्दी**

## कलावंतांशी गप्पांतून उलगडले व्यक्तिमत्त्व..

विभागीय नाट्य संमेलनात कलावंतांशी गप्पा टप्पा हा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमातून रसिकांनाही निवडक प्रश्न विचारण्याची संधी प्राप्त झाली होती. आपल्या लाडक्या कलावंतांचे अनुभव, किस्से ऐकण्यासाठी बीडकर मोठ्या संख्येने उपस्थित होते. दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी, सचित पाटील, गौरी कुलकर्णी, गणेश चंदनशिवे यांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवला. यावेळी सिनेसृष्टीतील अनुभव या कलावंतांनी रसिकांपुढे मांडले. बीड येथील रसिकांच्या मनातील अनेक प्रश्न निवेदकाने विचारले. तसेच सद्या सिनेसृष्टीत चालणाऱ्या घडामोडींबाबतही त्यांनी मते मांडली. बीड येथील नवोदित कलावंतांना या क्षेत्रात येण्यासाठी काय केले पाहिजे, यासंबंधीही उपस्थितांकडून मार्गदर्शन केले. व्यक्तीरेखा साकारताना त्याचा व्यक्तीगत जीवनावर काय परिणाम होतात, हे देखील कलावंतांनी मांडले. नवोदित कलावंत नाट्य क्षेत्राचे प्रशिक्षण घेऊन त्यात प्राविण्य मिळवतात, असा सरावही हवा असल्याचे कुलकर्णींनी सांगितले.